# गोदरेज सिक्युरिटी सोल्यूशन्सतर्फे फायर सेफ्टी कॉन्क्लेव्हचे आयोजन

**मुंबई, (कौशिक माधवानी) :** फायर सेफ्टीविषयी वाढत असलेली काळजी लक्षात घेऊन, गोदरेजने फायर सेफ्टीविषयी चर्चा करण्यासाठी परिसंवादाचे आयोजन केले होते. तसेच, आग लागण्यास प्रतिबंध करणे व त्याचा



प्रतिकूल परिणाम इमारतीवर होणे रोखणे, यावरही जागृती करण्यात आली. परिसंवादामध्ये सहभागी झालेले प्रमुख पाहुणे होते - मेहेरनोश पिठावाला, व्हीपी व ग्लोबल हेड, गोदरेज सिक्युरिटी सोल्यूशन्स अँड सिस्टीम्स; के. शामी, फायर अडव्हॉयजर, केंद्र सरकाररचे गृह मंत्रालय; मेजर जनरल सोली पावरी, माजी सुरक्षा सल्लागार, भारतीय रिझर्व्ह बँक; बुरझिन सरभनवाला, वरिष्ठ जोखीम व्यवस्थापन तज्ज्ञ, आयसीआयसीआय जनरल इन्शुरन्स; विनायक साने, फायर सिक्युरिटीवरील सीनिअर कन्सल्टंट; कॅप्टन कानन, मुख्य सुरक्षा अधिकारी, सेंट्रल बँक; संदीप मालवी, उपायुक्त, ठाणे; बीआयएसमधील वरिष्ठ कार्यकारी; एस. बी. खरबडे, डेप्युटी चीफ फायर ऑफिसर, मुंबई अग्निशमन दल.

अलीकडच्या काळात देशात विविध ठिकाणी आगी लागण्याच्या घटना अनेक घडल्या आणि अशा घटनांचे प्रमाण सर्वाधिक असण्याच्या शहरांच्या यादीत मुंबई आघाडीच्या शहरांपैकी एक आहे. कमला मिल्समधील घटनेनंतर, अनेक व्यावसायिक इमारती, रेस्तराँ, बार आदींनी अद्याप फायर सेफ्टीची दक्षता घेतलेली नाही व त्यासाठी आवश्यक उपाय योजलेले नाहीत. मुंबई अग्निशमन दलाने स्टार हॉटेल, लोकप्रिय पब, रेस्टो-बार व क्लब, जिमखाना असलेल्या अशा ५६६ इमारतींची पाहणी केली आणि त्यातील जवळजवळ ९० टक्के इमारतींनी फायर सेफ्टी नियमांचे पालन केले नसल्याचे आढळले. नियमांचे पालन न करणाऱ्यांना महाराष्ट्र फायर सेफ्टी अँड लाइफ प्रिव्हेन्शन अक्ट २००६ या नुसार नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत.